Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/शाखा एन/ऑ.ला./२०२५/4123
दिनांक : 24 NOV 2025

प्रति,
प्राचार्य / मुख्याध्यापक
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये
सातारा,सांगली, कोल्हापूर

विषय- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेचे द्वितीय गुणपत्रक / प्रमाणपत्र, तात्पुरते प्रमाणपत्र व स्थलांतर प्रमाणपत्र RPF प्रक्रीयेद्वारे ऑनलाईन प्रणालीमधून देणेबाबतची कार्यपध्दती..........

संदर्भ- राज्य मंडळाचे क्र.रा.मं./परीक्षा-३/४००२ दि- १९/११/२०२५ चे पत्र.

उपरोक्त संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेचे द्वितीय गुणपत्रक / प्रमाणपत्र (Duplicate Marksheet/ Certificate), तात्पुरते प्रमाणपत्र (Provisional Certificate) व स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) देण्यासाठी दि.१९/११/२०२५ पासून मंडळाच्या www.mahahsscboard.in या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने कार्यपध्दती सुरू करण्यात आली आहे. विदयार्थ्यांनी किंवा शाळा/कनिष्ठ महाविदयालयानी उपरोक्त संकेतस्थळ Open करुन विदयार्थी लॉगिन या Option मधून खाली दिलेल्या कार्यपध्दतीनुसार द्वितीय गुणपत्रक / प्रमाणपत्र (Duplicate Marksheet/ Certificate), तात्पुरते प्रमाणपत्र (Provisional Certificate) व स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) मागणीबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

०१. द्वितीय गुणपत्रक / प्रमाणपत्र (Duplicate Marksheet/ Certificate), तात्पुरते प्रमाणपत्र (Provisional Certificate) व स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) यासाठी यापूर्वीचे सर्व प्रकारचे शुल्क रद्द करण्यात आले असून सरसकट प्रती द्वितीय गुणपत्रक / प्रमाणपत्र (Duplicate Marksheet/ Certificate), तात्पुरते प्रमाणपत्र (Provisional Certificate) व स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) यासाठी रू ५००/- (रूपये पाचशे फक्त) कोणत्याही प्रती साठी आकारण्यात आले आहे. यापुढे मागणी अर्जांसाठी स्वतंत्र शुल्क आकारण्यात येणार नाही.

०२. माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये तसेच विद्यार्थ्यांना यासाठी आधारकार्ड OTP based च्या आधारे द्वितीय गुणपत्रक / प्रमाणपत्र (Duplicate Marksheet/ Certificate), तात्पुरते प्रमाणपत्र (Provisional Certificate) व स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) यासाठी अर्ज करता येईल.

०३. सद्यस्थितीत १९९० सालापासून e-marksheet प्रणालीमध्ये विद्यार्थ्यांचा सर्व डाटा उपलब्ध असल्याने १९९० नंतरचे Duplicate गुणपत्रक / प्रमाणपत्र मागणी केल्यास त्याची soft copy अर्जदारास उपलब्ध होईल.

०४. प्रमाणपत्र मागणीसाठी हस्तपोच By Hand व पोस्टाव्दोर By Post अशी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

०५. प्रचलित पद्धतीनुसार द्वितीय प्रमाणपत्र मागणी प्रस्तावावर संबंधित माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का, मुख्याध्यापक /प्राचार्य यांची स्वाक्षरी घेण्यात येत होती, तथापि सुधारित Online प्रणालीमध्ये माध्यमिक शाळेचे / कनिष्ठ महाविद्यालयाचे शिफारसपत्र घेण्याची आवश्यकता नाही. तसेच द्वितीय प्रमाणपत्रावर संबंधित माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का, मुख्याध्यापक / प्राचार्य यांची स्वाक्षरी घेण्याची आवश्यकता नाही.

०६. ऑनलाईन प्रणालीत एकदा भरणा करण्यात आलेले शुल्क कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही. त्यामुळे माहिती भरताना ती अचूक भरणे आवश्यक आहे.

०७. खालील सूचना विदयार्थ्यांना आपलेमार्फत अवगत कराव्यात.

**Please read the following instructions carefully:**

- विद्यार्थ्यांनी अर्जामधील तपशील अचूकपणे भरणे आवश्यक आहे.
  The students must fill in the details in the application accurately.
- द्वितीय गुणपत्रक / प्रमाणपत्र अत्यावश्यक व गरज असल्यास, तात्काळ सेवा म्हणून जादा रु. १००/- शुल्क भरल्यानंतर व अर्ज मंडळास प्राप्त झाल्यानंतर ०३ दिवसांत दिव्तीय गुणपत्रक / प्रमाणपत्र मिळू शकतील.
  If the duplicate marksheet/certificate is urgently required, it can be obtained within 3 days after paying an additional fee of Rs. 100/- and once the application is received by the board.
- द्वितीय गुणपत्रक / प्रमाणपत्र नियमित शुल्क भरल्यानंतर व अर्ज मंडळास प्राप्त झाल्यानंतर ०७ कार्यदिवसांत मिळू शकतील.
  The duplicate marksheet/certificate will be available within 7 working days after the payment is made and the application is received by the board.
- कार्यालयाने परीक्षेचा निकालानंतर शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांना मूळ गुणपत्रकाची प्रत दिल्यानंतर संबंधित निकालापासून ३ महिन्यांच्या आत दुसरी प्रत मिळणार नाही.
  After the original marksheet is distributed through the school/college, the second copy will not be available within 3 months of the result declaration.
- स्थानांतरण प्रमाणपत्र प्रस्तावातील सर्व कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर कार्यालयीन कामाच्या ७ दिवसात देण्यात येईल.
  The transfer certificate will be issued within 7 working days after the completion of all documentation.
- तात्पुरते प्रमाणपत्र सर्व कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर कार्यालयीन कामाच्या ८ दिवसात देण्यात येईल.
  The provisional certificate will be issued within 8 working days after the completion of all documentation.
- अनुत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांना दिव्तीय प्रमाणपत्र / स्थानांतरण प्रमाणपत्र / तात्पुरते प्रमाणपत्र दिले जात नाही.
  Students who have not passed the examination will not be issued duplicate certificate/transfer certificate/provisional certificate.

- एकदा भरलेले शुल्क कोणत्याही कारणास्तव परत मिळणार नाही.
  Once the fee is paid, it will not be refunded under any circumstances.
- द्वितीय गुणपत्रक / प्रमाणपत्र कागदपत्र तयार झाल्यानंतर २ महिन्यांच्या आत स्वीकारावी, त्यानंतर मंडळाची जबाबदारी राहणार नाही.
  The marksheet/certificate must be collected within 2 months after the document is ready, after which the board will no longer be responsible.
- सर्व कागदपत्रे फक्त संबंधित विद्यार्थ्यांना दिली जातील.
  All documents will be provided only to the concerned students.
- द्वितीय गुणपत्रक / प्रमाणपत्र कागदपत्र स्वीकारण्यासाठी हस्तपोच (By Hand) हा पर्याय अर्ज करताना निवडला असल्यास, कागदपत्र तयार झाल्यानंतर २ महिन्यांच्या आत स्वीकारावी, त्यानंतर मंडळाची जबाबदारी राहणार नाही.
  While applying, if you have selected 'By Hand' option to collect the documents, then marksheet/certificate must be collected within 2 months after the document is ready, after which the board will no longer be responsible.

उपरोक्त सर्व सुचनांची नोंद घेवून त्यानुसार कार्यवाही करावी. संबंधित विदयार्थ्यांना आपलेमार्फत सर्व सूचना अवगत करण्यात याव्यात व शाळा/कनिष्ठ महाविदयालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द कराव्यात.

(सुभाष रा. चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

प्रत- माहितीस्तव

१.शिक्षणाधिकारी (माध्य) सातारा, सांगली व कोल्हापूर.
२. मा.शिक्षण उपसंचालक कोल्हापूर